महात्मा गांधी मिशन विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर

मानव्य विद्याशाखे अंतर्गत मराठी विषयातील विद्यावाचस्पती (पीएच.डी.)

पदवीकरिता

सादर करावयाच्या शोधप्रबंधाचा अंतिम गोषवारा

*** संशोधन शीर्षक ***

''स.ना.सूर्यवंशी यांच्या समग्र साहित्याचा विविधांगी अभ्यास''

*** संशोधक ***

प्रीती योसेफ बनकर

*** संशोधन मार्गदर्शक ***

प्रा.डॉ. राम गायकवाड

सहाय्यक प्राध्यापक भारतीय आणि विदेशी भाषा विभाग,

एमजीएम विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर.

\- 2025

‘स.ना.सूर्यवंशी यांचा समग्र साहित्याचा अभ्यास’

★ प्रस्तावना :

स.ना.सूर्यवंशी हे अष्टपैलू लेखक आणि बहुआयामी व्यक्तिमत्व होते. ते उत्तम किर्तनकार, उत्कृष्ट नाटककार, सिद्धहस्त कांदबरीकार, अनुवादक चरित्र - आत्मचरित्रकार, पत्रकार, संपादक होते. परंतु दुर्भाग्याने हा अष्टैपलू लेखक समाजाला वाचक मनाला आजही फारसा परिचीत नाही. त्यांनी ६ व ७ नोव्हेंबर १९७२ पुणे येथे झालेल्या आठव्या मराठी खिस्ती साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद भूषविले होते, तसेच त्यांच्या लेखन कार्याचा यथोचित गौरव म्हणून केंद्र सरकार आणि राज्य शासन यांचे विविध साहित्यिक पुरस्कार त्यांच्या साहित्याला मिळालेले आहेत.

एक लेखक लिहितो, म्हणजे नेमके काय करतो, तर तो त्याचे स्व अनुभव, तसेच तत्कालीन सामाजिक, राजकीय, धार्मिक अनुभव जे त्याला समाजाला, जीवनाला कलाटणी देणारे वाटतात, ते शब्दबद्ध करतो, साहित्यात जिवंत करतो, अशाच प्रकाशन स.ना.सूर्यवंशी यांनी लिखाण केले असून त्यांच्या साहित्यातून तत्कालीन समाजाचे सर्वांगीण चित्रण पाहावयास मिळते. त्यंच्या साहित्याला ऐतिहासिक संदर्भ लाभलेले असून आजच्या काळात त्या संदर्भांना अनन्य साधारण महत्त्व प्राप्त झाले आहे, त्यामुळेच त्यांच्या साहित्याचे संशोधन हे एक प्रचंड आव्हान होते, ते आव्हान या संशोधनाच्या स्वरुपात पेलण्यात आल्याचे समाधान वाटते.

स.ना.सूर्यवंशी यांच्या लिखाणाच्या प्रेरणा, त्यांच्या लिखाणाचे स्वरूप, त्यांच्या लिखाणावर कोणाचा प्रभाव होता किंवा नाही, त्यांच्या लिखाणाचे आशय, विषय, वैशिष्ट्ये, वेगळेपण या सर्वांचा सखोल अभ्यास ‘स.ना.सूर्यवंशी यांच्या समग्र साहित्याचा अभ्यास’ या संशोधन प्रकल्पातून केला असून सदरील विषयावरील प्रबंधातून त्यांची मांडणी करण्यात आली आहे.

★ **अभ्यास विषय निवडीमागची भूमिका -**

प्रस्तुत संशोधनासाठी स.ना.सूर्यवंशी यांच्या समग्र साहित्याचा अभ्यास हा विषय निवडण्यामागे सर्वात महत्त्वाचे कारण म्हणजे सत्यवान नामदेव सूर्यवंशी ऊर्फ स.ना.सूर्यवंशी यांच्या साहित्याची ओळख,वाङ्मयीन सेवेचा परिचय करून देणे, मराठी ख्रिस्ती साहित्याच्या परंपरेत स.ना.सूर्यवंशी यांचे नाव आदराने घेतले जाते. पण त्यांच्या साहित्य लेखनाच्या वैभवाची ओळख अजुनही हवी तशी झालेली नसल्याकारणाने त्यांचे कार्यकर्तृत्व अंधारातच राहिले ही खरोखरच दुर्देवाची बाब म्हणावी लागेल.

त्यांनी जवळपास दोनशेच्या आसपास पुस्तके लिहिली, त्यांनी लिहिलेल्या सर्वच पुस्तकांचा परिचय करून देणे शक्य नव्हते, कारण ती पुस्तके आजघडीला कोठेही उपलब्ध नाहीत. जी पुस्तके महत्प्रयासाने प्राप्त झाली त्यावर संशोधन कार्य करण्यात आले असून स.ना.सूर्यवंशी यांच्या वाङमयीन सेवेची ओळख त्यांच्या साहित्याचे वाङ्मयीन मूल्य या सर्वांचा परिचय करून देण्याचे कार्य या संशोधना मार्फत केले आहे.

★ **पूर्व संशोधन -**

सदरील संशोधन विषयावर यापूर्वी कुठल्याही विद्यापीठात, संस्थेत संशोधन करण्यात आलेले नसून, संशोधनाकरिता निवडलेला विषय हा पूर्णत: नवीन आणि अपरिचीत असाच आहे. कोणीही स.ना.सूर्यवंशी यांच्या कुठल्याही साहित्य प्रकारावर, कशाही स्वरुपाचे किंवा कसल्याही प्रकारचे संशोधन केलेले नाही. त्यामुळे संशोधन करतांना नवीन वाटा निर्माण कराव्या लागल्या.

★ **संशोधन विषयाची व्याप्ती -**

प्रस्तुत संशोधनासाठी स.ना.सूर्यवंशी यांच्या समग्र साहित्याचा अभ्यास करण्यात आला असून कथा, कादंबरी, ख्रिस्ती आध्यात्मिक, मार्गदर्शन भक्तीगीते, नाटक, आत्मचरित्र,चरित्रलेखन यासह सूर्यवंशी यांनी संपादन केलेल्या 'आपण' या साप्ताहिकाचा अभ्यास करण्यात आला असून संशोधनास पूरक असलेल्या इतरही संदर्भ ग्रंथांचा आढावा घेण्यात आलेला आहे.

संशोधन पद्धती -

प्रस्तुत संशोधनाचे स्वरूप हे मानव्य विद्या शाखेसंबंदी असल्याने प्रस्तुत संशोधनात वर्णनात्मक

(M.C.A. - American Linguistic Association) Æ .

★ **अभ्यासाची साधने -**

स.ना.सूर्यवंशी यांच्या वाङ्‌मयीन कार्याचा आढावा घेणारे शोधनिबंध, विविध संदर्भग्रंथ तसेच त्यांच्या

★ **अभ्यासाची साधने -**

संपर्कातील किंवा सहवासातील व्यक्तिंशी प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष साधलेली चर्चा.

पुढील प्रमाणे –

३) स.ना.सूर्यवंशी यांच्या साहित्याची प्रेरणा अभ्यासणे

४) स.ना.सूर्यवंशी यांच्या साहित्यावरील प्रभाव अभ्यासणे.

५) स.ना.सूर्यवंशी यांचे मराठी ख्रिस्ती साहित्यातील योगदान स्पष्ट करणे.

★ गृहतिके -

१) स.ना.सूर्यवंशी हे ख्रिस्ती धर्माने प्रेरित होते.

२) स.ना.सूर्यवंशी यांनी कादंबरी, ख्रिस्ती भक्तीगीते नाटक, चरित्र, आत्मचरित्र, किर्तन यांचे लेखन केले. 'आपण' साप्ताहिकाचे संपादन केले.

३) स.ना.सूर्यवंशी यांचे लेखन अत्यंत अभ्यासपूर्ण आहे. मात्र ते दुर्लक्षित राहिले.

४) स.ना.सूर्यवंशी यांच्या लेखनाची भाषा प्रमाण भाषेसह बोली देखील आहे.

५) स.ना.सूर्यवंशी यांचे साहित्य समाज प्रबोधन करणारे आहे.

★ प्रकरणाची रुपरेखा -

● प्रकरण पहिले

पहिल्या प्रकरणामध्ये मराठी ख्रिस्ती साहित्याचे स्वरूप अभ्यासले असून यामध्ये ख्रिस्ती मराठी वाङ्मयावर विशेष प्रकाश टाकला आहे. यामागील महत्त्वाचे कारण म्हणजेच स.ना.सूर्यवंशी हे ख्रिस्ती होते. त्यामुळे ख्रिस्ती मराठी साहित्याचा अभ्यास करणे क्रमप्राप्त होते. ख्रिस्ती मराठी साहित्याच्या स्वरुपाचा अभ्यास करतान बऱ्याच ऐतिहासिक बाबींचा उलगडा झाला. विशेषत: मराठी भाषेच्या विकासोचे स्वरूप, मराठी साहित्याच्या आधुनिकतेचे अत्यंत महत्त्वाचे कारणे, मराठीतील विविध वाङ्मय प्रकार या सर्वांच्या निर्मिती मागील, सकारात्मक बदला मागील ऐतिहासिक संदर्भ मिळाले ब्रिटिश भारतात व्यापारासाठी आले होते. परंतु हा व्यापार केवळ व्यवहारापुरता मर्यादित न राहता, भारतावर राज्य करण्याची त्यांची महत्त्वांकाक्षा बळावत गेली. या मागील मुख्य कारण म्हणजे भारतातील जनता, वेगवेगळया जाती, भाषा, संस्कृती, रुढी, परंपरा, चालीरीती यांनी एकमेकांपासून वेगळे जीवन जगत होती. भारतीय जनतेतील एकजुटीचा अभाव परस्परांबद्दल प्रेम, दया, समानता या भावनेचा पूर्णत: अभावी या सर्व पार्श्वभूमीवर

ब्रिटिशांना भारतावर दीडशे वर्षे राज्य करणे अतिशय सहज साध्य झाले. या दीडशे वर्षात ब्रिटिशांनी केवळ भारतात व्यापार किंवा राज्यच केले नाही तर भारतातील जीवनपद्धती ढवळून काढण्याचे कार्यही त्यांच्यामार्फत झाले. महाराष्ट्र हे राज्य देखील त्यामध्ये होतेच. महाराष्ट्राची मुख्य भाषा म्हणजेच मातृभाषा 'मराठी' ही होती. परंतु या मराठी भाषेच्या विकासासाठी कोणीही झटत नव्हते. ब्रिटिशांना याची गरज भासली. कारण ज्या ठिकाणी आपण व्यापार करतो, त्या ठिकाणची भाषा शिकणे अत्यंत गरजेचे आहे याची पूर्ण जाणीव ब्रिटिशांना होती. त्यानुसार त्यांनी मराठी भाषेला अत्यंत जवळून शिकण्याचा, आत्मसात करण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या प्रयत्नांच्या परिणाम स्वरूप मराठी भाषेचा विकास होत गेला. मराठी भाषेचे आधुनिकीकरण होत गेले. मराठी ख्रिस्ती साहित्याची पार्श्वभूमी अभ्यासल्यानंतर मराठी भाषेचा विकास घडत गेलेला आढळून येतो. एकंदरीत ब्रिटिशांचे भारतातील आगमन हे मराठी भाषेच्या विकासास पूरक आणि पोषक ठरले. ख्रिस्ती धर्माच्या प्रचार आणि प्रसारासाठी आणि व्यापारासाठी ब्रिटिशांना मराठी भाषेच्या प्रभावी करण्याची भाषा शुद्धतेची विरामचिन्हांच्या योग्य वापरांची, अर्थवाही शब्दकोशाची अक्षरांच्या छपाईची गरज भासली. त्यामुळे भारतात, महाराष्ट्रात मुद्रणालये ब्रिटिशांनी सुरू केली. इंग्रजी भाषेच्या धर्तीवर विरामचिन्हे मराठीत आणले. शब्दकोशाची निर्मिती केली. या सर्व घटना मराठी भाषेच्या विकासास कारणीभूत झाल्या हे एक 'शाश्वत' सत्य आहे. आरंभीच्या काळात ख्रिस्ती तत्वज्ञानाची भारतीयांना ओळख व्हावी म्हणून ख्रिस्ती मराठी साहित्याची निर्मिती मोठ्या प्रमाणावर करण्यात आली. केवळ धार्मिक प्रसार हे हेतू नसून काव्य, बोध, ललित, शिक्षण, माहिती, सुधारणा, वैचारिक देवाण-घेवाण यासाठी देखील ख्रिस्ती मराठी साहित्याची निर्मिती होऊ लागली आणि ख्रिस्ती मराठी लेखकाची एक मजबुत फळीच ब्रिटिश कालखंडात निर्माण झाली. ब्रिटिशांच्या भारत सोडल्यानंतर स्वातंत्र्य प्राप्तीनंतर अनेक प्रतिभावंत मराठी ख्रिस्ती लेखकांनी ख्रिस्ती मराठी साहित्याची धुरा समर्थपणे सांभाळली. त्यामध्ये स.ना.सूर्यवंशी हे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागते. त्यांच्या समग्र साहित्याचा अभ्यास करणे हेच या शोध प्रबंधाचा मुख्य हेतू आहे.

* **प्रकरण दुसरे**

दुसऱ्या प्रकरणातून स.ना.सूर्यवंशी यांच्या जीवन आणि कार्याचा अभ्यास करण्यात आला. त्यांचा जन्म, जन्मठिकाण, त्यांची कौटुंबिक पार्श्वभूमी, त्यंचा समाज, समाज बांधव, त्यांचे वास्तव्य, त्यांचे शिक्षण, जगणे, त्यांची साहित्य सेवा, त्यांनी हाताळलेले साहित्य प्रकार, त्यांना साहित्य सेवेबद्दल मिळालेले विविध पुरस्कार, ख्रिस्ती साहित्य संमेलनात त्यांनी भूषविलेले अध्यक्षपद, ख्रिस्ती साहित्याबद्दल त्यांचे परखड, निर्भिड विचार, दलित ख्रिस्ती ही संकल्पना, त्यांचे सर्व समावेशक लिखाण या सर्वांचा ऊहापोह, अभ्यास या प्रकरणात केला आहे. ते जरी ख्रिस्ती होते तरीही केवळ ख्रिस्ती मराठी साहित्य निर्मितीच त्यांनी केली नाही तर सूर्यवंशी यांच्या लेखणीचा आवाका अफाट होता. त्यांचे व्यक्तिमत्व अष्टपैलू आणि बहुआयाची होते. या सर्वांवर दुसऱ्या प्रकरणातून प्रकाश टाकला.

* **प्रकरण तिसरे**

तिसऱ्या प्रकरणातून त्यांच्या कादंबऱ्याचे स्वरूप आणि वैशिष्ट्ये अभ्यासले असून त्यांच्या कादंबऱ्याचे वेगळेपण अधोरेखित करण्यात आलेले आहे. त्यांच्या कादंबरी लेखना मागील प्रेरणा, कादंबरी लेखनाचे विषय, आशय, संकल्पना तसेच त्यांनी मांडलेले समाजवास्तव जपलेले समाज भान, जोपासलेली सामाजिक जाणीव या सर्वांचाच परिचय त्यांच्या कादंबरी लेखनातून घडल्याशिवाय राहत नाही. त्यांच्या कादंबऱ्याच्या शीर्षकातूनच त्यांनी हाताळलेल्या विषयाची, मांडलेल्या वास्तवाची दाहकता समजून येते. 'पत्र्याची चाळ', 'धर्मशाळा', 'गोड कारली', 'गोड देऊळ', नंदनवनातील काटेरी फुलवेल', 'क्रांती', 'काल आणि आज', 'स्वप्न चांदण्याचे', 'चटक चांदणी' हे त्यांच्या कादंबऱ्यांची नावे त्यांच्या लिखाणातील वेगळेपणाची साक्ष देतात. ठराविक साच्यात साचेबद्धपणे तेच तेच लिखाण न करता त्यांनी त्यांची वाट निर्माण केली. मराठी साहित्याला तोपर्यंत वर्ज्य असणाऱ्या विषयाची मांडणी त्यांनी केली. दु:खी, दारिद्र, धिक्कारलेले, नाकारलेले समाजाच्या खिजगणतीतही नसणाऱ्या लोकांचे 'जीर्ण आणि जगणं' त्यांनी शब्द बध्द करून बोलते केले. धर्मांतरित ख्रिस्ती लोकांचे जीवन, समाजाचा त्यांच्या विषयी असलेला पूर्वग्रहदुषित दृष्टीकोन

त्यांनी साहित्यातून मांडला. 'महार' या हिंदुतील जातीत हिंदु उच्चवर्णियांनी अस्पृश्य समजलेल्या समाजाचे जगणं त्यांनी परखडपणे मांडले. त्यांच्या लिखाणाला असत्याचे वावडे होते. असाहाय्य लोकांचे दु:ख मांडतांना त्यांची लेखणी अतिशय आक्रमक होती. मानव म्हणून जगण्याचा अधिकार सर्वांना सारखाच आहे. त्यामुळे समस्त मानवजात 'एकसमान' आहे असे त्यांच्या लिखाणातून सतत जाणवत राहते.

त्यांच्या अनुवादित कादंबऱ्या या सुध्दा अधिक वाचनीय आहेत. त्यांचे इंग्रजी भाषेवरील प्रभुत्व याद्वारे सिध्द होते. भारतातील जीवन भारतीयांचे जगणं यांचे दर्शन त्यांच्या मूळ काबंदऱ्यातून घडतेच शिवाय परदेशातील प्रथा, रुढी, परंपरा, परदेशातील आदिवासी जमात, नागासाकी वरील अनुबॉम्ब हल्ला या सर्वांवर आधारित इंग्रजी भाषेतील त्यांनी केलेल्या मराठी अनुवादामुळे मराठी भाषेतील साहित्यात अधिक मौलिक भर पडली आहे.

- **प्रकरण चौथे**

चौथ्या प्रकरणातून 'नाटक' या वाङ्‌मयासाठी स.ना.सूर्यवंशी यांचे योगदान स्पष्ट होते. विविध नाट्य मंडळासाठी त्यांनी केलेले नाट्यलेखन, हाताळलेले विविध विषय, त्यांचे हे कार्य खरोखरच वाखाणण्याजोगे आहे. त्यांच्या नाट्य सेवेच्या कार्याला लक्षात घेता, महाराष्ट्र शासनाने त्यांच्या 'फुटपायरी' या नाटकाला पुरस्कार दिला. 'ठासून झालं पाहिजे' या नाटकातून एका नाटककाराची कैफियत, त्यांची दिनचर्या, त्यांच्या संसाराची होणारी होरपळ या सर्वांचे वास्तवरित्या चित्रण केलेले आहे. नाटकाच्या निर्मितीसाठी 'संसार' मोडण्यासाठी नायक मागे पुढे पाहत नाही. बायकोच्या अश्रू ऐवजी नाट्य रसिक प्रेक्षकांच्या चेहऱ्यावरील हसू नाटककाराला लाखमोलाचे वाटते याचे मन हेलावून टाकणारे वर्णन अत्यंत मार्मिकपणे करण्यात लेखक पूर्णत: यशस्वी झाले आहेत. तसेच 'फुटपायरी' या नाटकातून अनाथ, अपंग, निराधार, भिकारी, गुन्हेदार यांच्या जीवनाचा दुर्दैवी पट अभ्यासतांना मन अजूनच हेलावून जाते. स.ना.सूर्यवंशी यांचे नाट्यलेखन वास्तवतेचे भान ठेवून, जीवनाचे आकलन करून मानवी व्यवहाराचे, जगण्याचे तत्वज्ञान मांडणारे आहे.

• **प्रकरण पाचवे**

पाचव्या प्रकरणात त्यांच्या आत्मचरित्र आणि चरित्र वाङ्मयाचे स्वरूप आणि वैशिष्ट्ये अभ्यासले असून त्यातून अत्यंत महत्त्वाचे असे ऐतिहासिक संदर्भ समोर आलेले आहेत. स.ना.सूर्यवंशी यांच्या आत्मचरित्रातून तत्कालीन हिंदू जातीयता, त्यातून खालच्या आणि अस्पृश्य समाजाला दिली जाणारी अमानवीय वागणूक 'महार' जातीचे दुर्दैवी जीवन वास्तव मांडले आहे. त्याचबरोबर धर्मांतरीत ख्रिस्ती लोकांना दिली जाणारी हीन वागणून या सर्वांचे वर्णन अतिशय सूचकपणे आणि साध्या, सोप्या भाषेत केले आहे. सूर्यवंशी यांना एक लेखक, नाटककार, संपादक, अनुवादक, पत्रकार या सर्व भूमिका पार पाडतांना कशा आणि किती अडचणींचा सामना करावा लागला, त्यांच्या वाट्यास आलेले एकाकीपण, समाजाने साथ सोडल्याचे दु:ख, त्यांच्या व्यक्तित्व आणि कार्यकर्तृत्व याकडे स्वसमाजाने केलेले दुर्लक्ष या सर्वांचे वर्णन त्यांच्या 'अगा जे कल्पिले नाही' या आत्मचरित्रातून येते.

तसेच त्यांनी लिहिलेले चरित्र लेखन हे अतिशय माहितीपूर्ण, ऐतिहासिक संदर्भ आणि दाखले संपन्न असे आहे. जी चरित्रमाला त्यांनी लिहिली त्यातून त्यांचे अभ्यासू व्यक्तिमत्व प्रगट होते. ख्रिस्ती मिशनऱ्यांचे भारतातील दीन, दलित, दुबळे, अनाथ, अस्पृश्य यांच्या करिता केलेले कार्य तसेच, त्यांचे शिक्षण विषय कार्य, भारतातील अनिष्ट रुढी, परंपरा यांना विरोध करण्याचे कार्य या सर्व बाबींवर या प्रकरणातून प्रकाश टाकण्यात आला.

ब्रिटीश सरकार किंवा ब्रिटीश मिशनरी हे बळजबरीने धर्मांतर करत नव्हते, ही विवादीत गोष्ट देखील पुराव्यासह, ऐतिहासिक संदर्भासह या प्रकरणातून सिध्द होते.

• **प्रकरण सहावे**

सहाव्या प्रकरणातून 'आपण' या साप्ताहिकाचे स्वरूप, वैशिष्ट्ये आणि कार्य स्पष्ट करण्यात आले असून, आपण द्वारे तत्कालीन समाजातील राजकीय, सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक, आर्थिक, ग्रामीण, शहरी तसेच राष्ट्रीय – आंतर राष्ट्रीय संबंध, परराष्ट्र धोरण या सर्वांवर प्रकाश टाकण्यात आलो आहे.

आदिवासी, मुसलमान, अस्पृश्य यांच्या समस्येवर प्रकाश टाकण्यात आला आहे. 'आपण' हे केवळ साप्ताहिक नसून तत्कालीन समाजाचा आरसा होते असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

- **प्रकरण सातवे**

सातव्या प्रकरणातून स.ना.सूर्यवंशी यांच्या साहित्याच्या भाषिक वैशिष्ट्ये आणि वेगळेपणावर प्रकाश टाकण्यात आला असून त्यांच्या साहित्यातून अभिव्यक्त झालेले निसर्ग वर्णन, निसर्ग सौंदर्य, भाषा सौंदर्य, समाज वास्तव, संवादातील सौंदर्य, यावर प्रकाश टाकण्यात आलेला असून त्यांनी लिखाण केलेल्या, इतर साहित्याची ओळख संशोधन करताना झाल्यामुळे त्याचा देखील आढावा या प्रकरणातून घेण्यात आला आहे.

- **प्रकरण आठवे**

परिशिष्ट्ये आणि उपसंहार या प्रकरणांमध्ये संपूर्ण संशोधनाच्या प्रकरणांचा थोडक्यात सारांश तसेच संशोधनातून हाती आलेले निष्कर्ष नोंदविण्यात आलेले आहे.

१) स.ना.सूर्यवंशी यांच्या साहित्याला ऐतिहासिक संदर्भ आहे.

२) स.ना.सूर्यवंशी यांच्या साहित्यातून सामाजिक बदल अभिव्यक्त होतात.

३) तत्कालीन समाजाचे वास्तव चित्रण हे त्यांच्या साहित्याचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे.

४) स.ना.सूर्यवंशी यांच्या साहित्यावर पूर्वासूरींचा प्रभाव जाणवत नाही.

सर्वात शेवटी परिशिष्ट्ये आणि उपसंहार दिलेले असून यामध्ये संशोधनाअंती हाती आलेले निष्कर्ष नोंदविले आहे.

निष्कर्ष

१) ख्रिस्ती साहित्याची निर्मिती ही मुळातच समाज सुधारणा या उद्देशाने झाली.

२) समाजातील अज्ञान, अंधश्रद्धा, अनिष्ट प्रथा, परंपरा यांना दूर करण्याच्या उद्देशाने ख्रिस्ती साहित्याची निर्मिती झाली तसेच ख्रिस्ती धर्मतत्वांचा भारतीय समाज मनाला परिचय व्हावा हाही उद्देश ख्रिस्ती साहित्य निर्मिती मागे होता.

३) भारतात झालेल्या धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक परिवर्तनाचे स्वरूप व महत्व उत्तम प्रकारे समजून घ्यायचे असेल तर ख्रिस्ती मराठी वाङ्मय निर्मितीचे स्वरूप आणि प्रेरणा अभ्यासने गरजेचे आहे.

४) मराठी वाङ्मयाला अमेरिकन आणि युरोपियन ख्रिस्ती लेखकांनी त्याचप्रमाणे ख्रिस्ती मराठी लेखकांनी वैभवप्राप्त नेण्यास मोठा हातभार लावला आहे.

५) गेल्या १८० वर्षात मराठी भाषिकांनी ख्रिस्ती धर्म स्वीकारला, तरी आपल्या मातृभाषेशी ते एकनिष्ठ राहिले.

६) आजच्या प्राप्त परिस्थितीत मराठी ख्रिस्ती साहित्याची हवी तशी प्रगती झालेली आढळत नाही.

७) ब्रिटिश भारतात आले ते व्यापार करण्याच्या उद्देशाने, तर त्या ब्रिटीश मिशनरी भारतात आले ते धर्म प्रसारासाठी, भारतीयांना सत्य परमेश्वराची ओळख करून देण्यासाठी, सेवा, त्याग, प्रेम, दया, शांती, समानता यांचा संदेश घेऊन ते आले.

८) पहिले मराठी व्याकरण, पहिला कोश, पहिले मुद्रणालय, पहिली स्त्रियांची शाळा इत्यादी बऱ्याच सांस्कृतिक घडामोडीच्या प्र्वर्तनाचे पहिले श्रेयही मिशनरी मंडळी कडेच आहे.

९) फादर स्टीफनसारख्या परकीय मिशनऱ्यालाच मराठीच्या व्याकरणाची सर्वप्रथम गरम भासली.

१०) सन १८१९ मध्ये माऊंट स्टुअर्ट एलफिन्स्टन या मुंबईच्या गर्व्हनरने प्रांताचा कारभार सुरळीत चालावा म्हणून उदार आणि सहिष्णू धोरणाचा अवलंब केला होता.

११) मराठी भाषेत जे ग्रंथ युरोपियांकडून आले ते लष्करी मुलकी, इंजिनिअरिंग इत्यादी खात्यातील अधिकाऱ्यांना एलफिन्स्टन यांनी मराठी शिकणे सक्तीचे केले होते म्हणूनच झाले.

१२) पेशवे काळात एलफिन्स्टनला मराठी भाषा अवगत होती.

१३) 'मराठी इंग्रजी कोश' मोल्सवर्थ या ब्रिटिशाने तयार करून १९३१ साली प्रसिध्द केला महाराष्ट्रात मोल्सवर्थला लोक 'मोरेश्वर शास्त्री' या नावाने ओळखीत असत.

१४) मराठी भाषेस आधुनिक कळा लावण्यात मेजर कँडीचा सिंहाचा वाटा आहे. विशेषत: भाषा शुध्दी आणि इंग्रजी भाषेप्रमाणे मराठीतही विरामचिन्हे वापरण्यावर त्याचा कटाक्ष असे.

१५) इंग्रजी भाषेतील विरामचिन्हे मराठीत मेजर कँडी यांनी आणले.

१६) मराठी भाषेला वळण लावून अर्जितावस्थेत नेण्याचे श्रेय ब्रिटीश राजवटीला द्यावे लागेल.

१७) 'विल्यम कॅरी' या ब्रिटीश मिशनऱ्याच्या भाषेचा विषयक कार्याचे, भारतात मुद्रण कलेचा पाया घालण्याचे कार्य, अर्वाचीन मराठी लेखनाचा पाया घालणाऱ्या कार्याची दखल पंडित जवाहरलाल नेहरूंनी 'दि डिस्कव्हरी ऑफ इंडिया' या ग्रंथात घेतली आहे.

१८) ब्रिटीश भारतात आल्यानंतर त्यांनी भारतात केलेल्या सुधारणेनंतर तत्कालीन समाजात 'पोरे आता शिका' हे वाक्य रुजू केले. कारण ब्रिटीशांच्या भारतातील आगमनानंतर भारतीय जनतेला पोस्ट, रेल्वे, आरोग्य, तार, शिक्षण आणि कायदा या सर्वांची ओळख झाली.

१९) ईस्ट इंडिया कंपनी सरकारच्या नियामक मंडळाने भारतातील प्रजेच्या शिक्षणाकडे विशेष लक्ष दिले.

२०) पेशवाईचा लोप झाला त्या वर्षी म्हणजेच १८१८ साली अमेरिकन – मराठी मिशनच्या अकरा शाळा होत्या.

२१) ग्रंथोत्तेजनासाठी 'दक्षिणाप्राईज कमिटी' निघाली.

२२) मराठी भाषेचा विकास आणि मराठी वाङ्मयात विविध साहित्य प्रकाराची भर हे इंग्रजी संस्कृतीने मराठी लोकांच्या जीवनावर टाकलेल्या प्रभावातून जन्माला आले.

२३) इंग्रजी राजवटीचा काळ भावनेपेक्षा बुध्दीवर, संश्लेषणापेक्षा विश्लेषणावर आणि आध्यात्मिक चर्चेपेक्षा भौतिक घडामोडींवर भर देणारा ठरला.

२४) इंग्रजी राजवटीमुळे वृत्तपत्र या देशात सुरू झाले.

२५) साहित्य हे विश्वात्मक असते.

२६) मराठी मनात ख्रिस्ती संवेदनाला फारसे स्थान नाही. कारण ख्रिस्ती धर्म हा परदेशीय धर्म आहे, हा घातक गैरसमज ख्रिस्ती लोकांनी भारतात केलेल्या धार्मिक, जातीय, शैक्षणिक, राजकीय, आर्थिक, सामाजिक, वैचारिक परिवर्तन हे कधीही दुर्लक्षित करू शकत नाही.

२७) ब्रिटीश आणि परकीय मिशनऱ्यांनी मराठी भाषा विषयक केलेले कार्य हे खरोखरच अतुलनीय आणि वाखाणण्याजागे आहे.

२८) आचार्य स.ना.सूर्यवंशी हे महाराष्ट्रात आजपर्यंत झालेल्या उल्लेखनीय मराठी ख्रिस्ती साहित्यिकांपैकी एक आहेत.

२९) स.ना.सूर्यवंशी हे पूर्वाश्रमीचे 'महार' या अस्पृश्य समजल्या जाणाऱ्याह जातीचे असून त्यांच्या वडिलांनी ख्रिस्ती धर्म स्वीकारला होता. यामुळे ते एक 'धर्मांतरित ख्रिस्ती' होते.

३०) स.ना.सूर्यवंशी यांनी कधीही स्वत:च्या प्रसिध्दीकडे फारसे लक्ष दिले नाही, ते कोणत्याही विशिष्ट संप्रदायाशी किंवा संघटनेशी संबंधित नव्हते.

३१) पूर्वाश्रमीचे महार असल्यामुळे त्यांच्या लिखाणातून वारंवार 'महार' या जातीच्या व्यथा, वेदना प्रकट होतात.

३२) धर्मांतरीत ख्रिस्ती असल्यामुळे ख्रिस्ती झाले तरीही जात कशी जात नाही याचा दाहक अनुभव ते साहित्यातून अभिव्यक्त करतात.

३३) भावी लेखकाला, किर्तनकाराला, नाटककाराला, कादंबरीकाला, निर्भिड आणि सच्चा संपादकाला जन्म देणारी परिस्थिती त्यांच्या आजुबाजूला होती.

३४) 'मिस मोर्लंड' यांनी स.ना.सूर्यवंशी यांना लिखाण करण्यास प्रेरणा दिली.

३५) स.ना.सूर्यवंशी यांनी जवळपास दोनशेच्या आसपास पुस्तके लिहिली.

३६) स.ना.सूर्यवंशी यांनी अनुवादित साहित्य देखील फार मोठ्या प्रमाणात लिहिले. इंग्रजीतून मराठीत भाषांतर करून त्यांनी अनेक महत्त्वाच्या, ऐतिहासिक दस्तऐवज असलेल्या साहित्यकृती मराठी साहित्याला दिल्या. दुर्दैवाने त्या आजही दुर्लक्षित आहेत.

३७) किर्लोस्कर, धनुर्धारी, मौजे, नवयुग, प्रतोद, नवशक्ती, लोकमान्य आदी प्रतिष्ठीत पत्रांत सूर्यवंशींनी लिखाण केले. तसेच 'तारका', वेणी, शृंगार या सिनेमा मासिकांतही लिखाण केले.

३८) ख्रिस्ती आवेश, बालबोधमेवा प्रेषित, साप्ताहिक आपण या पत्रांचे, नियतकालिकांचे संपादन केले.

३९) मुस्लिम, आदिवासी यांच्यावर होणाऱ्या अन्याय, अत्याचारांवर त्यांनी आपल्या लिखाणातून वाचा फोडली.

४०) कुष्ठरोगी, महारोगी, दारिद्री, अनाथ, अपंग, निराधार, वेश्या, चोर, डाकू, खूनी, वेडे, भिकारी, निराश्रित हे सर्व त्यांच्या साहित्याचा विषय होत.

*** संशोधक ***
प्रीती योसेफ बनकर

*** संशोधन मार्गदर्शक ***
प्रा.डॉ. राम गायकवाड